क्रिमीनल अपील क्र.५६/२०१५ आणि गुन्हा प्रकटीकरण शाखा, गु.नों.क्र.१५२/२००८ व १६२/२००८ (विशेष मोक्का केस क्र.०४/२००९) मधून उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड.श्री. राजा ठाकरे यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी २०१५/प्र.क्र.२६८/पोल-१०

गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०५ फेब्रुवारी, २०१६

संदर्भ विधी व न्याय विभाग चे प्रत्र क्र. ४४७९/१२८/क्रिमी.जन/१५/अे ब्रँच, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५

शासन निर्णय:

क्रिमीनल अपील क्र.५६/२०१५ आणि गुन्हा प्रकटीकरण शाखा, गु.नों.क्र.१५२/२००८ व १६२/२००८ (इंडियन मुजाहिदीन केस क्र.०४/२००९) मधून उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड. श्री.राजा ठाकरे यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रान्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.राजा ठाकरे यांना खालीलप्रमाण फी अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी - रू.३०,०००/-

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.राजा ठाकरे यांना अपरिणामकारक सुनावणी फी अनुज्ञेय असणार नाही.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०२) (०१) शहर पोलीस आस्थापना - (२०५५ ००९७) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशिर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५८१/१५/व्यय-७, दिनांक ५.१२.२०१५ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०६१२०१५००४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun Vishnupant Joshi

Digitally signed by Arun Vishnupant Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Arun Vishnupant Joshi
Date: 2016.02.06 12:01:35 +05'30'

(अ.वि.जोशी)

कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सह पोलीस आयुक्त (गुन्हे), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.
२. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. ॲड.श्री.राजा ठाकरे, ३०१, मारुती मँशन, १७ रघुनाथ दादाजी स्ट्रिट, फोर्ट मुंबई - १.
६. विधी व न्याय विभाग (अे/ब्रँच), मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती (पोल-१०).